मंत्रालयीन सेवा
जनहिताय सर्वदा

महाराष्ट्र शासन
**महिला व बाल विकास विभाग,**
नवीन प्रशासकीय भवन, तिसरा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु
चौक,मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

मेल आयडी- desk9.wcd-mh@mah.gov.in

---

क्रमांक : बाहआ-२०२२/प्र.क्र. २५ /का-९ दिनांक : १३/९/२०२३

प्रति,

संचालक, (माहिती तंत्रज्ञान)
माहिती व तंत्रज्ञान महासंचालनालय,
मंत्रालय, मुंबई

विषय:- **महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करणेबाबत.**

महोदय,

महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोग, वरळी या कार्यालयातील प्रशासकीय अधिकारी व परिविक्षा अधिकारी या पदांसाठी जाहिरातीचा मसुदा सोबत जोडला आहे. तरी सदर जाहिरात महाराष्ट्र शासनाच्या www.maharshtra.gov.in संकेतस्थळावर या प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला,

सहपत्र:- वरीलप्रमाणे

(श.ल. अहिरे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

निवड नस्ती, का.क्र.९

मंत्रालयीन सेवा
जनहिताय सर्वदा

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**
**महिला व बाल विकास विभाग,**
नवीन प्रशासकीय भवन, तिसरा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

क्र.बाहआ-२०२२/प्र.क्र.२५/ का-९ दिनांक: १३/९/२०२३

प्रति,
सह/ उप सचिव (आस्थापना),
सर्व मंत्रालयीन विभाग,
मंत्रालय, मुंबई,

**विषय-** महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, वरळी येथे प्रशासकीय अधिकारी व परिविक्षा अधिकारी ही पदे ही पदे प्रतिनिथुक्तीने भरण्याबाबत

**संदर्भ-**१) सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. एसआरव्ही-२०११/ प्र.क्र.१३७/ का.१२ दि.१७/१२/२०१६

महोदय,

राज्य शासनाच्या विविध विभागात/विभागाच्या अधिपत्याखालील मंडळे/ महामंडळातील पदांवर संबंधित प्रशासकीय विभागाकडून प्रतिनियुक्तीने करावयाच्या नियुक्त्यांबाबतचे नवीन धोरण सामान्य प्रशासन विभागाने संदर्भाधीन शासन निर्णय दि.१७/१२/२०१६ अन्वये जाहीर केलेले आहे. सदर शासन निर्णयातील तरतूदीनुसार महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या वरळी येथील कार्यालयातील खालील पदे प्रतिनियुक्तीने भरावयाची आहेतः-

| अ. क्र. | पदनाम | पदस्थापनेचे ठिकाण | वेतनश्रेणी (सातव्या वेतन आयोगानुसार) | ज्या संवर्गातून पद भरावयाचे आहे त्या संवर्गाची नावे |
|---|---|---|---|---|
| १ | प्रशासकीय अधिकारी | महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, वरळी | स्तर S-२३, ६७७००-२०८७०० किंवा स्तर S-१७, ४७६००-१५११०० | मंत्रालयीन अवर सचिव/ कक्ष अधिकारी पदास समकक्ष क्षेत्रीय कार्यालयातील अधिकारी/ कर्मचारी |
| २ | परिविक्षा अधिकारी | महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, वरळी | स्तर १४, ३८६००-१२२८०० | क्षेत्रीय कार्यालयातील समकक्ष अधिकारी/ कर्मचारी |

२. तरी सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांना विनंती करण्यात येते की, सदर पत्र त्यांच्या अधिपत्याखालील सर्व क्षेत्रीय कार्यालयांच्या निदर्शनास आणण्यात यावे. सदर पदांवर प्रतिनियुक्तीने जाण्याकरीता इच्छूक असलेल्या आपल्या विभागाच्या अधिपत्याखालील क्षेत्रीय कार्यालयातील संबंधित अधिकारी/ कर्मचा-यांची नावे त्यांच्या मागील पाच वर्षाच्या गोपनीय अहवालासह, वैयक्तिक माहिती व ना-विभागीय चौकशीचे प्रमाणपत्र इ. माहितीसह या विभागास प्रस्ताव सादर करावा. तसेच प्रस्ताव सादर करतांना संदर्भाधीन शासन निर्णय दि.१७/१२/२०१६ मधील तरतूदीनुसार सदर अधिकारी/कर्मचारी प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यास पात्र आहे किंवा कसे याबाबतची माहिती सोबतच्या विहित विवरणपत्रामध्ये या विभागाकडे दि. ३०/०९/२०२३ पर्यंत निश्चितपणे प्राप्त होतील अशा रितीने पाठविण्याबाबत आपल्या विभागाच्या अधिनस्त क्षेत्रीय कार्यालयांना कळविण्यात यावे.

३. सदर पत्राची प्रत महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावरील संदेशफलक या टॅबखाली प्रसिध्द करण्यात येत आहे.

आपला,

(श. ल. अहिरे)
सह सचिव,महाराष्ट्र शासन

सहपत्र-वरीलप्रमाणे

प्रत-

१) कक्ष अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव अग्रेषित.
२) निवडनस्ती (का ९)